# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- २२/०८/२०२२

## मा. स्थायी समिती सभा
## सभा सुचना क्र. ०९

प्रति,
सन्मा.श्री./श्रीमती.........................................................
स्थायी समिती सदस्य/सदस्या,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. २६/०८/२०२२ रोजी सकाळी १०.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०९ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती

मा. सभापती, स्थायी समिती यांच्या मान्यतेने

(वासुदेव शिरवळकर)
महापालिका सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. २६/०८/२०२२ सभा सुचना क्र. ०९ विषयपत्रिका

| प्रकरण क्र. | विषय |
|---|---|
| --- | मागील सभांचे इतिवृत्तांत - |
| १३६ | दि. 17/05/2022, दि. 20/05/2022 (दि. 17/05/2022 रोजीची तहकुब सभा), दि. 14/06/2022, दि. 17/06/2022, दि. 28/06/2022, दि. 19/07/2022 व दि. 02/08/2022 रोजींच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | मध्य/प्रश्न (इंटरप्रिलेशन्स) - निरंक |
| --- | विनंती अर्ज – निरंक |
| --- | परिवहन व विशेष समित्यांचे ठराव – निरंक |
| --- | आयुक्तांकडील पत्रे व कामकाज - |
| १३७ | पशुसंवर्धन विभागात तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर कार्यरत पशुवैद्यकीय अधिकारी यांना वेतनवाढ देणेबाबत. |
| १३८ | सन 2021 मध्ये करोना काळामध्ये मे. महालक्ष्मी कृपा इन्फ्रास्ट्रक्चर एल.एल.पी. या कंपनीने पोलीस प्रशासनास पुरवठा केलेल्या बसेसचे देयक अदा करणेबाबत. |
| १३९ | करोना काळामध्ये न चालवलेल्या बसेसच्या इन्श्युरन्स प्रिमीयमच्या रक्कमेची परिगणना करुन मे. महालक्ष्मी कृपा इन्फ्रास्ट्रक्चर एल.एल.पी. या कंपनीस रक्कम अदा करणेबाबत. |
| १४० | मे. भागीरथी एमबीएमटी प्रा.लि. यांनी दि. 01/08/2019 ते 17/12/2020 या कालावधीत Ded/Extra किलोमीटरचे देयक अदा करणेबाबत. |
| १४१ | मे. भागीरथी एमबीएमटी प्रा.लि. यांची बँक गॅरंटी रक्कम परतावा करणेबाबत. |
| १४२ | मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. 64, दि. 18/08/2019 विचार विनिमय करुन निर्णय घेणेबाबत. |
| १४३ | निविदेस मान्यता देणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग) |
| १४४ | निवीदेला मंजुरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग) |
| १४५ | मा. आयुक्त सो. यांनी मंजूर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग) |
| १४६ | मा. आयुक्त सो. यांनी शिफारस केलेल्या निविदेचे अवलोकन करणे. (महिला व बालकल्याण विभाग) महिला व बालकल्याण विभागा अंतर्गत Ms-Cit प्रशिक्षण बाबत. |
| १४७ | मा. आयुक्त सो. यांनी शिफारस केलेल्या निविदेचे (ऑफलाईन) अवलोकन करणे. (महिला व बालकल्याण विभाग)<br>मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील इयत्ता 10वी पास झालेल्या गरीब व गरजू मुला/मुलींना तसेच अपंग व्यक्तीच्या मुलांचा गुणगौरव करुन साहित्य वाटप करणे. |
| --- | शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे |
| --- | समित्यांचे किंवा उपसमित्यांचे अहवाल - निरंक |

दिनांक :- २२/०८/२०२२

(वासुदेव शिरवळकर)
महापालिका सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.स्थायी समिती सभा दि.२६/०५/2022

## // गोषवारा //

९३५

प्रकरण क्र. :- पशुसंवर्धन विभागात तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर कार्यरत पशुवैद्यकीय अधिकारी, डॉ.विक्रम मधुकर निराटले यांच्या ठोक मानधनात वाढ करणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका पशुसंवर्धन विभागात पशुवैद्यकीय अधिकारी, डॉ.विक्रम मधुकर निराटले यांची जा.क्र.मनपा/सा.प्र./1036/2017-18, दि.05/03/2018 रोजीच्या आदेशान्वये प्रतिमहा रु.30,000/- या तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर नेमणूक करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने श्री. विक्रम निराटले, पशुवैद्यकीय अधिकारी हे दि.05/03/2018 पासून ठोक मानधनावर कार्यरत असून त्यांना सहा महिन्याचा कालावधी समाप्त झाल्यानंतर त्यांना एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन वेळोवेळी मा. स्थायी समितीच्या मान्यतेने त्यांच्या नियुक्तीचे नविकरण करण्यात आलेले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पशुसंवर्धन विभागामध्ये कार्यरत असल्यापासुन डॉ. विक्रम निराटले, पशुवैद्यकीय अधिकारी यांनी खालीलप्रमाणे कामकाज पार पाडलेली आहेत.

1) ठाणे जिल्हातील 06 महानगरपालिकांपैकी मिरा भाईंदर महानगरपालिकेत पशुगणनेचे काम प्रथम दर्जाचे केलेले आहे.
2) महापालिका क्षेत्रातील 100 श्वानांचे निर्बिजीकरण केंद्र कार्यान्वित केले.
3) भारत सरकारच्या पशु कल्याण मंडळाच्या आदेशानुसार प्रथमत:च मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पशुसंवर्धन विभागामार्फत भटक्या मांजरांचे निर्बिजीकरण/लसीकरण केले जात आहे.
4) भटके आजरी श्वान/मांजर यांच्या उपचारसाठी चालता फिरता दवाखाना (मोबाईल व्हॅन) चालू करण्यात आली.
5) मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात मृत जनावरांसाठी स्मशान भूमीचे काम प्रस्तावित आहे.

तसेच महापालिका कार्यालयीन कामकाजाकरीता श्वान निर्बिजीकरण केंद्र-भाईंदर, मंत्रालय, पशसंवर्धन विभाग-ठाणे, मुलुंड, भिवंडी तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जखमी जनावरांवर प्रथमोपचार करण्यासाठी स्वखर्चाने जावे लागते. त्याकरीता कुठलाही वाहन/इंधन भत्ता देण्यात येत नाही. त्याकरीता वेतनात रु.20,000/- इतकी वाढ करणेबाबत डॉ. विक्रम निराटले, पशुवैद्यकीय अधिकारी (ठोक मानधन) यांनी विनंती केलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर सुधारित आकृतीबंधानुसार पशुवैद्यकीय विभागासाठी पशुशल्य चिकित्सक हे 01 पद सातव्या वेतन आयोगानुसार S-20 - 56100-177500 या वेतनश्रेणीत मंजुर आहे. सदर पदावर सरळसेवेने नियुक्ती केल्यास प्रती महा रु.96,021/- इतका खर्च अपेक्षित आहे.

त्यामुळे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पशुसंवर्धन विभागामध्ये तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर कार्यरत डॉ. विक्रम निराटले, पशुवैद्यकीय अधिकारी यांच्या कामाचे स्वरुप पाहता त्यांना देण्यात येणाऱ्या रु.30,000/- ठोक मानधनात वाढ करणेस शिफारस आहे.

(मा.आयुक्त यांचे मान्यतेने)

(मारुती गायकवाड)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

D:\आस्थापना विभाग\गोषवारा\गोषवारा- पशुवैद्यकीय अधिकारी वेतनवाढ.doc

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. २९/०८/2022.

## सार्व. आरोग्य विभाग

## // गोषवारा //

९४५

**प्रकरण क्र :- मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे (आरोग्य विभाग)**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण 2022 होणार आहे. या सर्वेक्षणात स्वच्छ सर्वेक्षण 2022 अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रात ODF ++ /Water Plus, Garbage Free City, महानगरपालिकेतर्फे देत असलेल्या विविध सेवांबाबत नागरीकांमध्ये जनजागृती करणे तथा स्वचछ सर्वेक्षण 2022 खालीलप्रमाणे विविध कमाच्या प्रस्तावास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे.

| अ.क्र | कामाचा तपशिल | ठेकेदाराचे नाव | कामाची रक्कम |
|---|---|---|---|
| 1. | मिरा भाईंदर महानगरपालिका स्वच्छ भारत मिशन (नागरी) स्वच्छ सर्वेक्षण 2022 करिता तांत्रिक सल्लागाराचे नियुक्ती (दि. 27/01/2022 ते दि. 26/07/2022 ) | M/s. B Kumar INFRA Advisory Pvt. Ltd. | Rs. 14,85,000/- |
| 2. | शहरातील प्रभाग हद्दी, गटारे नाले, तलाव, विहिरी यांचे Geo Mapping (GIS Mapping) करणे | मे. ऑर्नेट टेकनॉलाजीस प्रा. लि. | Rs. 8,80,280/- |
| 3. | स्वच्छ सर्वेक्षण 2021 करीता IEC Activity व्दारे जनजागृती करणे करणेबाबत | मे.ऑर्नेट टेकनॉलाजीस प्रा. लि. | Rs. 12,30,000/- |
| 4. | | मे. फुलराणी ॲडव्हरटायझींग ॲन्ड मार्केटींग | Rs. 6,99,800/- |
| 5. | 60 लिटर क्षमतेचे HDPE Twin bin GI stand सह सिमेंट फाउंडेशनमध्ये बसविणे. | मे. एन. डी. सप्लायर्स | Rs. 9,61,875/- |
| 6. | स्वच्छ सर्वेक्षण 2023 Project Implementation Unit करीता तांत्रिक सल्लागार नियुक्तीबाबत | M/s. B Kumar INFRA Advisory Pvt. Ltd. | Rs. 24,60.000/- (10 महिने) |

सार्व. आरोग्य विभागामार्फत स्वच्छ सर्वेक्षण 2022 करीता अ.क्र. 01 ते 05 करीता वरील नमुद केलेली कामे पुर्ण करून घेण्यात आलेली आहेत. त्याचप्रमाणे स्वच्छ सर्वेक्षण 2023 Project Implementation Unit करीता अ.क्र. 06 कामास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिली आहे.

तरी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 (D) नुसार मा. स्थायी समितीच्या अवलोकनार्थ सादर.

(रवि पवार)
उपायुक्त (आरोग्य)
मिरा भाईंदर महानगरपालिका

D:\Raj Documents\STANDING GOSHVARA\SBM janjagruti bill goshwara.docx

TM

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे - ४०१ १०१, दुरध्वनी क्र. : ८१९ २८२८.

महिला व बालकल्याण विभाग

मा. स्थायी समिती सभा दि. २६|०८|2022

## // गोषवारा//

१४६

**प्रकरण :- मा.आयुक्त यांनी शिफारस केलेल्या निविदेचे अवलोकन करणे**

**विषय क्र. :- महिला व बालकल्याण विभागा अंतर्गंत Ms-Cit प्रशिक्षण बाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागा अंतर्गंत गरीब व गरजू मुलीं/महिलांना **Ms-Cit प्रशिक्षण देणेकरिता** मा.आयुक्त यांची मंजुरी घेवुन ई-टेंडरींगद्वारे जाहिर निविदा सुचना वृत्तपत्रांत प्रसिध्द करुन ऑनलाईन निविदा मागविण्यात आली होती त्याकरिता पात्र निविदाधारकांनी सादर केलेल्या कमी दरांच्या निविदेस मा.आयुक्त यांनी दि.14/06/2022 रोजी मान्यता दिलेली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका, महिला व बालकल्याण विभागा अंतर्गंत "मुली/महिलांसाठी **Ms-Cit प्रशिक्षणाकरिता** रु.25,00,000/- रक्कमेच्या मर्यादेत खर्च होणार आहे.

तरी सदरचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 73(ड) अन्वये मा.स्थायी समितीच्या अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

**संजय शिंदे**
**उपायुक्त(मबाक)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

TM

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे - ४०१ १०१, दुरध्वनी क्र. : ८१९ २८२८.

महिला व बालकल्याण विभाग

मा. स्थायी समिती सभा दि. २९/०८/2022

## // गोषवारा//

१४७

**प्रकरण :- मा.आयुक्त सो यांनी शिफारस केलेल्या निविदेचे(ऑफलाईन) अवलोकन करणे**

**विषय क्र. :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील इयत्ता 10 वी पास झालेल्या गरीब व गरजू मुला/मुलींना तसेच अपंग व्यक्तीच्या मुलांचा गुणगौरव करुन साहित्य वाटप करणे**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील इयत्ता 10 वी पास झालेल्या गरीब व गरजू मुलींना तसेच अपंग व्यक्तीच्या मुलांचा गुणगौरव करुन साहित्य वाटप करणेकामी मा.आयुक्त यांची मंजुरी घेवुन वृत्तपत्रांत जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करून ऑफलाईन निविदा मागविण्यात आली होती त्याकरिता पात्र निविदाधारकांनी सादर केलेल्या कमी दराच्या निविदेस मा.आयुक्त यांनी दि.03/01/2022 रोजी मान्यता दिलेली आहे. त्याअनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील इयत्ता 10 वी पास झालेल्या गरीब व गरजू मुलींना तसेच अपंग व्यक्तीच्या मुलांचा गुणगौरव करुन साहित्य वाटप करणेकामी रु.10,00,000/- रक्कमेच्या मर्यादेत खर्च झालेला आहे.

तरी सदरचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 73(ड) अन्वये मा.स्थायी समितीच्या अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

**संजय शिंदे**
**उपायुक्त(मबाक)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**